**अंतिम कारणे दाखवा नोटीस**

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/ 49 /2019
नाशिक दिनांक :- 22/ 1 /2019

प्रति,

श्रीम. उषा प्रकाश सोनवणे,आरोग्य सेविका (म)
प्रा.आ.केंद्र.मोकभनगी,उपकेंद्र.विसापूर, ता. कळवण
व्दारा, तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, कळवण

आपण आरोग्य सेविका (म) यापदावर प्रा.आ.केंद्र.मोकभनगी,उपकेंद्र.विसापूर,ता.कळवण येथील कार्यरत ठिकाणी दि.08/01/2015 ते दि.02/03/2016 असे 1 वर्ष 1 महिना 23 दिवस अनाधिकृत गैरहजर राहणे,आदिवासी जनतेस आरोग्य सेवेपासून वंचीत ठेवणे, वरिष्ठांचे आदेशाचा अवमान करणे या कारणास्त्व आपणा विरुध्द खाते चौकशी सुरु करणेसाठी याकार्यालयाचे जा.क्र.आरोग्य/अस्था-5/1298/2017 दिनांक 09/10/2017 अन्वये ज्ञापन व दोषारोप परिशिष्ट 1 ते 4 देण्यात आले होते. आपण विहीत मुदतीत ज्ञापनाचा खुलासा सादर न केल्याने आपणा विरुध्दचे दोषारोपांची सविस्तर चौकशी करण्यासाठी या कार्यालयाचे आदेश क्रंमाक आरोग्य/आस्था-5/185/2018 दि.01/03/2018 अन्वये. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग,नाशिक यांचे कडील पत्र क्र. क्र.विशा.4/खाचौ/सी.आर.03/2018 दिनांक 12 नोव्हेंबर, 2018 अन्वये चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालाआहे. दोषारोप निहाय चौकशी अधिकारी यांचे अभिप्राय खालील प्रमाणे.

| दोषारोप क्रमांक | दोषारोपाचे स्वरुप | चौकशी अधिकारी यांचा अभिप्राय |
|---|---|---|
| 1 | दि.08/01/2015 ते दि.02/03/2016 असे 1 वर्ष 1 महिना 23 दिवस अनाधिकृत गैरहजर राहणे | दि.08/01/2015 ते दि.02/03/2016 असे 1 वर्ष 1 महिना 23 दिवस अनाधिकृत गैरहजरी सिध्द होते |
| 2 | आदिवासी जनतेस आरोग्य सेवेपासून वंचीत ठेवणे | सदरचा आरोप देखील सिध्द होतो |
| 3 | वरिष्ठांचे आदेशाचा अवमान करणे | सदरचा आरोप देखील सिध्द होतो |

चौकशी अहवालातील दोषारोपातील निष्कर्षात तुमचे विरुद्धचे 03 दोषारोपांपैकी सर्व दोषारोप सिद्ध होतात. यावरुन आपण महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चा भंग केला आहे हे सिद्ध होते. चौकशी अहवालाची प्रत यासोबत जोडुन पाठविणेत येत आहे. चौकशी अहवालाशी शिस्तभंग विषयक प्राधिकरण सहमत झाले असुन खाते चौकशी प्रकरणी आपणास शास्ती होणेबाबत शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणुन माझे मत पक्के झाले आहे.

त्यास्तव आपले विरुध्द **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) 1964 भाग 3 नियम** ~~4~~-चा (2,3) **नुसार** ---- दोन वेतनवाढी कायम स्वरुपी बंद का करण्यात येवु नये ---- **अशी शिक्षा का करण्यात येऊ नये** याबाबतचा आपला लेखी खुलासा ही नोटिस मिळाले पासुन 15 दिवसांचे आंत पुराव्याचे दस्ताऐवजांसह इकडेस सादर करावा. तसेच आपणांस समक्ष अजुनही काही लेखी व तोंडी पुरावे सादर करावयाचे असल्यास ते वरील मुदत्तीत सादर करावेत. खुलासा मुदतीत सादर केला नाही तसेच समाधानकारक नसल्यास आपणास प्रस्तावित केलेली शिस्तभंगाची कार्यवाही मान्य आहे असे गृहीत धरुन शिक्षेचे आदेश पारित करणेस येईल याची नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

**प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती ,कळवण.**

2/- सोबत अंतिम कारणे दाखवा नोटीसच्या तीन प्रती जोडल्या आहेत. त्यातील एक प्रत श्रीम.सोनवणे,आरोग्य सेविका (म) यांना (चौकशी अहवालाचे प्रतीसह) बजाविणेत येवुन दुसऱ्या प्रतिवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन सदर पोहचची प्रत इकडेस सादर करावी. तसेच तीसरी प्रत ही आपले कार्याल्यात पुराव्याकामी जपून ठेवावी.

स्वाक्षरी XXX
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**